प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA

संचार विभाग, केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
DEPARTMENT OF COMMUNICATION, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 91 22 2266 0502 फैक्स/Fax: 91 22 22660358

वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
ई-मेल email: helpdoc@rbi.org.in

डिसेंबर 19, 2016

**अंकफलकांमध्ये 'आर' हे इनसेट अक्षर वाढत्या आकाराचे अंक असलेल्या व इंटालिओ छपाई नसलेल्या रु.50 च्या बँक नोटा आरबीआय वितरीत करणार**

भारतीय बँक लवकरच, दोन्हीही अंक फलकांमध्ये 'आर' हे इनसेट अक्षर असलेल्या, भारतीय रिझर्व बँकेचे गव्हर्नर डॉ. उर्जित पटेल ह्यांची सही असलेल्या आणि बँक नोटेच्या मागील बाजूवर '2016' हे छपाईचे वर्ष असलेल्या महात्मा गांधी मालिका 2005 मधील रु.50 मूल्याच्या बँक नोटा वितरीत करणार आहे.

ह्या नोटांमध्ये, अंक फलकात वाढत्या आकाराचे अंक असतील. वृत्तपत्र निवेदन क्र.2016-2017/1403 दि. डिसेंबर 4, 2016 द्वारा देण्यात आलेल्या, महात्मा गांधी मालिका 2005 मधील ह्यापूर्वी देण्यात आलेल्या रु.50 च्या नोटांप्रमाणेच ह्या नोटांचे डिझाईन असेल. (अधिक माहितीसाठी वृत्तपत्र निवेदन क्र. 2016-2017/751 दि. सप्टेंबर 23, 2016 चा संदर्भ घ्यावा.)

ह्या बँकेने ह्यापूर्वी दिलेल्या रु.50 मूल्याच्या बँक नोटा वैध चलन असणे सुरुच राहील.

**अजित प्रसाद**
सहाय्यक सल्लागार

**वृत्तपत्र निवेदन : 2016-2017/1577**